दूरध्वनी क्र ०२२-२२८१३८२६
email- desk13c-cmtd@mah.gov.in

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
दालन क्रमांक ७०७ (विस्तार), मंत्रालय,
मादाम कामा रोड हुतात्मा राजगुरू चौक
मुंबई- ४०० ०३२.

**क्रमांक : सनिनि- ०३२१/ प्र.क्र.४१/१३स** **दिनांक :- १५ एप्रिल, २०२५**

प्रति,

सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

**विषय :- महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या नियमात सुधारणा करणेबाबत.**

संदर्भ :- महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात असाधारण भाग चार- ब, दि.१५ एप्रिल,२०२५ रोजीची अधिसूचना.

महोदय,

उपरोक्त विषयाशी संबंधित संदर्भांकीत अधिसूचनेची प्रत सोबत जोडली आहे.

०२. महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१, मधील सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या नियमात सुधारणा करणेबाबतच्या अनुषंगाने दिनांक १५ एप्रिल, २०२५ रोजीच्या राजपत्रात हरकती व सूचना मागविण्यासाठी नियम प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत.

०३. तरी, सदर नियमाबाबतची अधिसूचना, हरकती व सुचना मागविण्यासाठी सर्व विभागीय सह निबंधक/ जिल्हा उपनिबंधक/ उप निबंधक यांना आपल्या स्तरावरून संबंधित फेडरेशन तसेच गृह निर्माण सहकारी संस्थांच्या निदर्शनास आणण्याच्या त्याचप्रमाणे, अधिसूचनेची प्रत कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्याच्या सुचना देण्यात याव्यात.

आपला,

( संतोष पाटील )
अपर निबंधक तथा सह सचिव
महाराष्ट्र शासन

c:\users\kunal.jadhav\desktop\rane\vivek\२०२१\पत्र\२०२४\सहकार आयुक्त अहवाल.docx

RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

**वर्ष ११, अंक ५४(२)]** **बुधवार, एप्रिल १६, २०२५/चैत्र २६, शके १९४७** **[पृष्ठे ५४, किंमत : रुपये ९.००**

**असाधारण क्रमांक १५१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ एप्रिल २०२५.

**अधिसूचना**

क्रमांक सनिनि- ०३२१/ प्र.क्र.४१/ १३स.— महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व १९६१ चे क्रमांक २४ चे कलम १६५ च्या पोट कलमे (१) आणि (२) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत त्यांस समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ यामध्ये आणखी सुधारणा करण्याचे प्रस्तावित केलेल्या या नियमांचे पुढील प्रारुप, त्यामुळे बाधित होणाऱ्या संभव असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी, उक्त अधिनियमाच्या कलम १६५ च्या पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे प्रसिद्ध करीत आहे, आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येते की, उक्त प्रारुप, दि. १६/०५/२०२५ रोजी किंवा त्यानंतर, महाराष्ट्र शासनाद्वारे विचारात घेण्यात येईल.

उक्त प्रारुपाच्या बाबतीत, उपरोक्त दिनांकापूर्वी, कोणत्याही व्यक्तीकडुन निर्गमित करण्यापूर्वी विभागाने भरावयाचे संभाव्य दि. १६/०५/२०२५ रोजी मा. प्रधान सचिव (सहकार व पणन), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, अनेक्स, मुंबई ४०० ०३२ यांच्या कार्यालयास प्राप्त झालेले कोणतेही आक्षेप किंवा सूचना शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

**प्रारुप नियम**

(१) या नियमांस महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) नियम, २०२५ असे म्हणावे.

(२) महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ यात (यापुढे ज्याचा उल्लेख मुख्य नियम असा करण्यात आला आहे.) च्या नियम २ मधील खंड (१) मध्ये कलम २४-अ खालील या मजकुरानंतर किंवा कलम १५४ब-६ हा मजकुर समाविष्ट करण्यात येईल.

(३) मुख्य नियम ४ मधील पोट-कलम (१) मधील खंड (इ) मधील उप-खंड (७), (८) आणि (८-अ) वगळण्यात येतील.

(४) मुख्य नियमाच्या नियम ८ मधील पोट-नियम (१) मध्ये :—

(१) खंड (फ) मधील नाममात्र आणि सहयोगी सभासद या मजकुर ऐवजी नाममात्र सहयोगी, संयुक्त आणि तात्पुरते सभासद हा मजकुर दाखल करण्यात येईल.

(२) खंड (एक्स-१) मध्ये कलम २४-अ या मजकुरानंतर कलम १५४ब-६ आणि कलम १५४ब-२८ हा मजकुर समाविष्ठ करण्यात येईल.

(५) मुख्य नियमाच्या नियम १० पोट-नियम (१) मधील तक्त्यातील, नोंद ५ मधील :—

(१) उप-वर्ग (क) च्या रकाना (३) मधील घरागहाण संस्था व घर बांधणी संस्था या मजकुराऐवजी, घरगहाण संस्था व घर बांधणी संस्था आणि परिसर संस्था हा मजकुर दाखल करण्यात येईल.

(२) वर्ग ५ मध्ये (क) मधील रकाना (२) आणि (३) उप-खंड (क) नंतर पुढील मजकुर दाखल करण्यात येईल.

| | |
|---|---|
| (ड) सहकारी गृहनिर्माण संघ | एका गृहनिर्माण संघामध्ये एकाच आराखडयात नोंदविलेल्या किमान दोन गृहनिर्माण सहकारी संस्थांचा समावेश होईल. |
| (इ) संस्थांचा संघ | एकाच आराखडयामध्ये नोंदविण्यात आलेल्या पाच किंवा अधिक गृहनिर्माण सहकारी संस्था किंवा इतर कायदेशीर संस्थांचा संघ |

(६) मुख्य नियमातील नियम २०-अ वगळण्यात येईल.

(७) मुख्य नियमातील नियम २०-ब वगळण्यात येईल.

(८) मुख्य नियमाच्या नियम २६ मधील कलम ३० चे पोटकलम (१) या मजकुरानंतर किंवा कलम १५४ब-१३ हा मजकुर समाविष्ट करण्यात येईल.

(९) मुख्य नियमाच्या नियम ३३ ऐवजी पुढील नियम दाखल करण्यात येईल.

३३ सभासदांची यादी प्रत्येक संस्थेकडुन ठेवण्यात येणारी सभासदांची यादी फॉर्म जे मध्ये राहिल.

(१०) मुख्य नियमाच्या नियम ५७-अ मधील पोट-नियम (७) खंड (ग) मधील उपखंड (३) ऐवजी पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :–

परंतु गृहनिर्माण संस्थांना उप-खंड (३) लागु राहणार नाही.

(११) मुख्य नियमाच्या नियम ५८ मधील कलम ७३ कअ मध्ये नमद केल्याप्रमाणे अपात्र या मजकुरानंतर किंवा कलम १५४ब-२३ हा मजकुर दाखल करण्यात येईल.

(१२) मुख्य नियमाच्या नियम ६० मध्ये :—

(१) पोट-नियम (१) मधील कार्यशील सदस्याने निवडलेल्या सदस्य हे शब्द वगळण्यात येतील.

(२) पोट-नियम (३) मधील कार्यशील हा शब्द वगळण्यात येईल.

(३) पोट-नियम (४) मधील कार्यशील हा शब्द वगळण्यात येईल.

(१३) मुख्य नियमाच्या नियम ६५ मधील पोट-नियम (१) चा खंड (१-अ) आणि (१-ब) वगळण्यात येतील.

(१४) मुख्य नियमाच्या ८५ मधील पोट-कलम (१) मधील कलम ९८, १०१ आणि १३७ खालील या मजकुराऐवजी कलम ९८, १०१, १३७ आणि १५४ब-२९ हा मजकुर दाखल करण्यात येईल.

(१५) मुख्य नियमाच्या नियम १०६ ब नंतर पुढील प्रकरणांचा समावेश करण्यात येईल.

## प्रकरण ११-ब

## सहकारी गृहनिर्माण संस्था

**१०६ सी १ गृहनिर्माण संस्थांना हे नियम नसणे**

नियम ४, १९, नियम २० चा पोटनियम (१), नियम २२, २५, २७, ३०अ, नियम ३५ ते ४८, नियम४९ब, ४९क, ५३, ५३क, ६३अ, ६६, ८६अ, नियम ९३ ते १०३ हे नियम गृहनिर्माण संस्थांना लागु होणार नाहीत.

**१०६ सी २ नाव आरक्षित करणे आणि बँकेचे खाते सुरु करण्यासाठी परवानगी मिळणेबाबतचा अर्ज.**

१) नियोजित गृहनिर्माण संस्थांसाठी नाव आरक्षित करणे आणि बँक खाते उघडण्याची परवानगी यासाठी प्रत्येक अर्ज नमुना-१ मध्ये सादर केला जाईल. सदरील अर्जासोबत खालील बाबी असणे क्रमप्राप्त असेल.

i. मुख्य प्रवर्तक यांची नियुक्ती करुन त्यांना अधिकृत करणेकामी घेण्यात आलेल्या सर्वसाधारण सभेस उपस्थित असणाऱ्या सभासदांची यादी आणि त्यासोबत अशा सभेचे इतिवृत्त.

ii. प्रस्तावीत भाडेकरु सह-भागीदारी गृहनिर्माण संस्था किंवा प्रिमायसेस संस्थेबाबतचे वास्तुविशारदांनी प्रमाणित केलेला बांधकाम सुरु करण्याचे प्रमाणपत्र किंवा बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र किंवा भाडेकरु सह प्रस्तावीत भागीदारी गृहनिर्माण संस्थेबाबतचे वास्तुविशारदांनी प्रमाणित केलेली तात्पुरता आराखडा नकाशाची प्रत किंवा मंजुर आराखडा नकाशा.

२) प्रस्तावित संस्थांचा संघ किंवा सहकारी गृहनिर्माण संघाचे नाव आरक्षित करणेबाबतचा आणि बँकेचे खाते सुरु करण्यासाठी परवानगी मिळणेबाबतचा प्रत्येक अर्ज हा नमुना वाय-२ मध्ये सादर करण्यात येईल. सदरील अर्ज हा प्रत्येक संस्थेच्या किंवा कायदेशीर संस्थेच्या किमान दोन अधिकृत पदाधिकाऱ्यांनी सही केलेली असावा. सदरील अर्जासोबत खालील बाबी असणे क्रमप्राप्त असेल.

i. मुख्य प्रवर्तकाची निवड करण्यासाठी व त्यांना अधिकृत करण्यासाठी घेतलेल्या बैठकीचे इतिवृत्त आणि अशा बैठकीला उपस्थित राहिलेल्या प्रवर्तकांचा ठराव.

ii. ज्या अन्वये सर्वसाधारण सभेस उपस्थित राहणे आणि आवश्यक त्या दस्तावेजांवर स्वाक्षरी करणेकामी कोणत्याही दोन पदाधिकाऱ्यांना संमती आणि अधिकार देण्यात आलेले आहेत असे नियोजित संस्थांचा संघाच्या प्रयोजनार्थ किमान पाच संस्थांच्या सर्वसाधारण सभेचे ठराव किंवा प्रस्तावित सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या प्रयोजनार्थ किमान दोन संस्था किंवा कायदेशीर संस्थांच्या सर्वसाधारण सभेचा ठराव.

iii. प्रत्येक वैयक्तिक संस्था किंवा कायदेशीर संस्थेच्या नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.

iv. वैयक्तिक संस्था किंवा कायदेशीर संस्था ही एकाच आराखडयाचा किंवा नकाशाचा भाग असल्याची बाब प्रमाणित करणारे वास्तुविशारद यांचे प्रमाणपत्र.

३) सदर अर्ज निबंधकांना नोंदणीकृत पोस्टने हात बटवडयाने किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे पाठवता येईल.

४) निबंधकांस उप-नियम (१) किंवा (२) अन्वये अर्ज मिळाल्यानंतर, निबंधकांनी त्यातील तपशिल त्यांच्याकडे नमुना वाय-३ मधील नोंदवहीमध्ये अनुक्रमांकसह नोंद घेऊन त्याची पोच द्यावी.

५) निबंधक हे नाव करताना आरक्षण व बँक खाते उघडताना प्रवर्तकांना त्यांच्या अर्जात आवश्यक त्या सुधारणा करण्याची परवानगी देतील.

६) निबंधक, असा अर्ज प्राप्त झाल्यापासुन ३० दिवसांचे आत निकाली काढतील. निबंधक प्रस्तावित संस्थेसाठी नाव आरक्षित करण्यासाठी व बँक खाते उघडण्यास परवानगी देतील किंवा योग्य ते कारण नमुद करुन सदर अर्ज नाकारुन सदर अर्जदारास कारणांसह लेखी कळवतील.

**१०६ सी ३ नोंदणीसाठीचा अर्ज आणि नोंदणी फी**

१) कलम १५४ब-३ अन्वये एखाद्या संस्थेचया नोंदणीसाठीचा अर्ज प्रस्तावित संस्थेचे नाव आरक्षित करण्यास व बँक खाते उघडण्यास परवानगी दिल्याच्या तारखेपासुन दोन महिन्यांच्या आत मराठी, हिंदी किंवा इग्रंजीत नमुना वाय-४ मध्ये करण्यात येईल.

२) अर्ज कलम १५४ब-२ मधील तरतुदींस अधिन राहुन मुख्य प्रवर्तकांनी अर्जावर स्वाक्षरी करुन संस्थेचे नियोजन उप-विधींच्या दोन प्रतींसह, त्यासोबत खालील नमुद करण्यात आलेली कागदपत्रे जोडावी.

(अ) ज्यांनी भाग भांडवलात योगदान दिलेले आहे अशा व्यक्तींची यादी, त्यासोबत त्यांचेपैकी प्रत्येकाने योगदान म्हणुन दिलेली रक्कम आणि त्यांनी अदा केलेले प्रवेश शुल्क देखील नमुद करण्यात यावे.

(ब) नियोजित संस्थेच्या खात्यामध्ये शिल्लक असणारी रक्कम ज्यामध्ये नमुद करण्यात आली आहे असे बँकेचे किंवा बँकानी दिलेले प्रमाणपत्र.

(क) उक्त संस्थेचे कामकाज आर्थिकदृष्टया कसे योग्य आहे याचे तपशिलवार स्पष्टीकरण ज्यामध्ये दर्शविण्यात आलेले आहे अशी योजना आणि ज्या योजनेतुन संस्थेने धारण केलेली स्थावर मालमत्ता निदर्शनास येते तसेच संस्थेने योजलेली खरेदी, अधिग्रहण किंवा तबदिलीचा तपशिल ज्यामध्ये देण्यात आलेला आहे अशी योजना.

(ड) याखाली नमुद करण्यात आलेल्या दराने आकारावयाची नोंदणी फी :

| | | रु. |
|---|---|---|
| अ | भाडेकरु मालकी गृहनिर्माण संस्था | ५,०००/- |
| ब | भाडेकरु सह-भागीदारी गृहनिर्माण संस्था | ५,०००/- |
| क | इतर गृहनिर्माण संस्था | ५,०००/- |
| ड | मागास वर्गीय व्यक्तींची गृहनिर्माण संस्था | ५०/- |
| इ | लोक आवास योजनेअंतर्गत गृहनिर्माण संस्था | ५०/- |
| फ | सहकारी गृहनिर्माण संस्था | ५,०००/- |

| | | |
|---|---|---|
| ग | संस्थांचा संघ | ५,०००/- |

३) अर्ज नोंदणीकृत पोस्टाने हात बटवडयाने किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे निबंधकांना पाठविला जाईल.

**१०६ सी ४ सभासदत्व होण्यासाठी इत्यादी करावयाच्या पूर्ततांच्या अटी**

१) संस्थेचा सहयोगी सदस्य किंवा तातपुरता सदस्य वगळता

(अ) त्याने किमान पाच भांगाचे हिश्श्यांचे / शेअर्सचे मूल्य आवि शंभर रुपये प्रवेश शुल्कासह ज्यामध्ये समाविष्ट नसल्यास सभासदत्वासाठीच्या संस्थेचया पोट-नियमांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या नमुन्यामध्ये लेखी स्वरुपात अर्ज केला आहे.

(ब) अर्जदाराने, संस्थेच्या सभासदत्वासाठीच्या अर्जासह, प्रवर्तक विकासक किंवा हस्तांतरणाकर्ता यांच्यासोबत यथोचित मुद्रांकित व नोंदणीकृत केलेल्या कराराची, नोंदणीकृत बक्षिसपत्राची प्रमाणित प्रत सादर केलेली नसल्यास,

(क) संस्थेच्या समितीकडुन त्याचा अर्ज मंजुर झालेला नसल्यास, कोणत्याही व्यक्तीला सदस्य म्हणुन मान्यता देण्यता येणार नाही.

परंतु, कलम १५४ब-१ (२०) (दोन ते बारा) मध्ये निश्चित केल्याप्रमाणे कोणत्याही व्यक्तींने अर्ज केल्यास, अर्जासोबत अशा सभासदत्वासाठी अर्ज करण्यास प्राधिकृत करणारा ठराव जोडणे बंधनकारक असेल.

**१०६ सी-५** :

i. कलम १५४ब-१ (१८) (अ) मध्ये निश्चित केलेली कोणतीही व्यक्ती, सभासदाच्या शिफारशीसह नमुना वाय-४ मध्ये कोणत्याही सभासदास सहयोगी सभासद होण्यासाठी अर्ज करु शकेल.
ii. ज्याने शिफारस केलेली आहे, अशा सभासदाच्या मृत्युनंतर अथवा अशा सहयोगी सभासदाच्या राजीनाम्यानंतर किंवा मृत्युनंतर सहयोगी सभासदाचे सभासदत्व संपृष्टात येईल.

**१०६सी-६ (१) तात्पुरत्या सभासदांच्या प्रवेशाची प्रक्रिया :**

(अ) कोणत्याही सभासदाच्या किंवा संयुक्त सभासदाच्या मृत्युनंतर अशा सभासदाचा नामनिर्देशित व्यक्ती संस्थेच्या संपत्तीमध्ये मृत सभासदाचे भाग (शेअर्स) किंवा हक्कासंदर्भात भविष्यातील कोणत्याही दाव्यांपासुन संस्थेचे क्षतिपूरण करण्यासाठी क्षतिपूर्ती पत्रासह नमुना वाय-४ नमुन्यामध्ये तात्पुरत्या सभासदत्वासाठी अर्ज करु शकेल. एकापेक्षा अधिक नामनिर्देशित व्यक्ती असल्यास सर्व नामनिर्देशित व्यक्ती एक संयुक्ती अर्ज करतील.

(ब) जर संस्थेचा सभासद नामनिर्देशन न बनवता मृत्यु पावल्यास, किंवा हस्तांतरणासाठी कोणीही नामनिर्देशिती पुढे न आल्यास, संस्था, अधिन खपाच्या किमान दोन स्थानिक दैनिक वृत्तपत्रामध्ये अशी सुचना प्रकाशित करुन, मृत सभासदाच्या कायदेशीर वारसांना तात्पुरता सभासद म्हणुन मान्यता देण्यासाठी अर्ज करण्याकरीता सुचित करील. अशी सुचना संस्थेच्या सुचना फलकावर देखील प्रदर्शित करण्यात येईल.

(क) सद्य परिस्थितीत समितीला योग्य वाटल्यास चौकशी केल्यानंतर आणि प्राप्त झालेल्या अर्ज विचारात घेतल्यानंतर समितीचे असे मत झाले की, व्यक्ती ही, मृत सदस्याचा कायदेशीर वारस किंवा प्रतिनिधी आहे तर, या नियमांच्या तरतुदीनुसार, कोणत्याही सदस्यास कायदेशीर वारस म्हणुन दाखल करुन घेतले जाईल. अर्जदाराने तात्पुरता सदस्य म्हणुन नमुना वाय-५ मध्ये क्षतिपूर्ती बंधपत्रासह आवेदनपत्र सादर करील.

(ड) जर एकापेक्षा अधिक दावा सांगणारे असतील तर त्यांना तात्पुरता सभासद कुणी व्हावे याबद्दल प्रतिज्ञापत्र करण्यास सांगण्यात येईल. पोट-नियम (अ) मध्ये नमुद केल्याप्रमाणे क्षतिप्रतिज्ञा पत्रात नाव असलेली व्यक्ती त्याच्या अर्जासह क्षतिपूर्ती बंधपत्र सादर करील.

(इ) दावेदारांनी सभासद कोणास होता येईल याबाबत करारामध्ये काही आणले नसेल तर समिती, त्यांना कायदेशीर वारसा प्रमाणपत्र किंवा उत्तराधिकारी प्रमाणपत्र किंवा सक्षम न्यायाधिकारणाचे प्रबंधपत्र सादर करण्यासाठी बोलावील.

(फ) कायदेशीर वारसांनी एकदा अभिलेखामध्ये नोंद झाली की, तात्पुरते सभासद हे तात्पुरते सभासद म्हणुन राहणे बंद होईल.

(ग) तात्पुरत्या सभासदास मालमत्तेचा हक्क किंवा स्वामित्व किंवा मालकी असणार नाही आणि त्याच्या नावाचा भाग पत्रावर समावेश केला जाणार नाही.

**२) कुटुंबव्यवस्थेचा आधारावर बदलीची प्रक्रिया :**

(अ) संस्थेच्या कोणत्याही सभासदाच्या किंवा कोणत्याही सदस्यांचा मृत्यु नंतर सह सभासदाचे अशा सभासदाचे किंवा सभासदांच्या कायदेशीर वारसाची मालमत्तेतील मृत सभासदाने किंवा सह सभासदाने धारण केलेल्या सदनिकेतील भाग, हक्क, स्वामित्व आणि हिताच्या बाबतीतील अटी आणि शर्तीची नोंदणी करुन कुटुंब व्यवस्थेच्या यथोचिरीत्या नोंदणी विलेख करण्यात येईल.

(ब) त्यानंतर कायदेशीर वारस नमुना वाय-५ मध्ये कुटुंब व्यवस्थेचा यथोचितरीत्या नोंदणी केलेल्या विलेख आणि भविष्यात कोणत्याही वेळी कोणत्याही व्यक्तींद्वारे संस्थेच्या मालमत्तेतील मृत सभासद किंवा सह सभासदाच्या सदनिकेतील भाग, हक्क स्वामित्व किंवा हित यांसाठी केलेल्या कोणत्याही दावांविरुध्द संस्थेची क्षतिपूर्ती करणारे क्षतिपूर्ती बंधपत्र यांसह अर्ज करील.

(क) समिती अर्ज मिळाल्यानंतर, सर्वाधिक खप, सुचना असलेल्या दोन स्थानिक दैनिक वृत्तपत्रामधुन तात्काळ प्रसिध्द करील. मृत सभासद किंवा सह सभासदांच्या सदनिकेतील भाग, हक्क स्वामित्व आणि हित यांच्या प्रस्तावित हस्तांतरणाशी बाबतीतील कोणतेही दावे किंवा आक्षेप मागविणारी एक जाहीर आमंत्रित करतील.

(ड) जर विहित कालावधीत कोणताही दावा किंवा आक्षेप प्राप्त झाले नाहीत तर, समिती मृत सभासद किंवा सहसभासद यांच्या सदनिकेतील भाग, हक्क, सामित्व आणि हिताचे यथोचितरीत्या नोंदणी केलेल्या कुटुंब व्यवस्थेमध्ये तरतुद असलेल्या कायदेशीर वारसास हस्तांतरण करील.

(ई) जर मृत सभासद किंवा सह सभासदाचे कायदेशीर वारस म्हणुन दावा करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीकडुन कोणतेही दावे किंवा आक्षेप प्राप्त झाल्यास किंवा यथोचितरीत्या नेष्पादित

केलेल्या कुटुंब व्यवस्थे संबंधात कोणत्याही वाद असेल तर, समिती मृत सभासदाच्या सदनिकेतील भाग, हक्क, सामित्व आणि हिताचे यथोचितरीत्या नोंदणी केलेल्या कुटुंब व्यवस्थेमध्ये तरतुद असलेल्या कायदेशीर वारसास हस्तांतरण करील.

**१०६सी-७ गृहनिर्माण संस्थेचे सभासद, अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी प्रशिक्षण व सरकार शिक्षण :**

१) प्रत्येक सहकारी गृहनिर्माण संस्था, संस्थांचा संघटन किंवा सहकारी गृहमिर्नाण संघटना यांचे सभासद, अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी राज्य संघीय संस्था किंवा राज्य शिटवर प्रशिक्षण संस्थेमार्फत वार्षिक शिक्षण व प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करील.

२) सहकार शिक्षण व प्रशिक्षण निधीसाठी प्रत्येक सहकारी गृहनिर्माण संस्था प्रत्येक सदस्यामागे दरमहा दहा रुपये तर प्रत्येक सहकारी गृहनिर्माण संघटना किंवा संस्थांच्या संघटना याकरीता वार्षिक रुपये एक हजार इतके अंशदान देईल. अशा अंशदानांचे संकलन करण्यात येईल व त्याचा वापर दरवर्षी आर्थिक वर्षात किंवा पुढील वर्षी प्रशिक्षण कार्यक्रमासाठी करण्यात येईल.

३) शिक्षण व प्रशिक्षण कालावधी शक्य होईल तेथवर ज्ञ्

अ) सभासदांसाठी वर्षातुन तीन तासांचे किमान एक सत्र,

ब) समितीचे सभासद, पदाधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी वर्षातुन तीन तासांची किमान दोन सत्रे, इतके असेल.

४) राज्य शासनाने अधिसुचित केलेली राज्य संघीय संस्था किंवा राज्य शिटवर प्रशिक्षण संस्था, सहकारी गृहनिर्माण संस्था, संस्थांची संघटना किंवा सहकारी गृहनिर्माण संघटना यांचे सभासद, अधिकारी व कर्मचाऱ्यांना सहकार शिक्षण व प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करील.

५) राज्य शासनाद्वारे अधिसुचित करावयाच्या राज्य संघीय संस्था किंवा राज्य शिखर प्रशिक्षण संस्था :-

अ) अधिनियमाच्या किंवा इतर कोणत्याही अधिनियमाच्या तरतुदींन्वये नोंदणी केलेल्या असतील.

ब) राज्यस्तरील कार्यात्मक क्षेत्र असेल,

क) त्यांच्या उपविधीमध्ये, संस्थेच्या सभासद, अधिकारी व कर्मचारी यांना सहकारी शिक्षण व प्रशिक्षण देण्यासाठी तरतुद करतील.

ड) संस्थांना सहकार शिक्षण व प्रशिक्षण देण्यासाठी पुरेसा पायाभुत सुविधा देतील.

इ) गुणवत्तापुर्ण अध्यपन व अध्यापनेत्तर कर्मचारीवृद देतील, आणि

फ) त्यांना सहकार शिक्षण व प्रशिक्षण देण्याच्या क्षेत्रामध्ये पुरेसा अनुभव असेल.

६) संस्था दरवर्षी अधिसुचित राज्य संघीय (फेडरल) संस्था किंवा राज्य शिखर प्रशिक्षण संस्थांच्या सहकार शिक्षण व प्रशिक्षण निधीसाठी तरतुद करतील व योगदान देतील.

**१०६सी-८ व्यक्तींचे नामनिर्देशन :**

१) संस्थेच्या उपविधींमध्ये तरतुद केल्याप्रमाणे, सहकारी गृहनिर्माण संस्थांचे सभासद किंवा सह सभासद, नामनिर्देशनाचा विहित नमुना सादर करुन तात्पुरत्या सभासदत्वासाठी कोणत्याही

व्यक्तीस किंवा व्यक्तींना नामनिर्देशित करु शकतील. सभासदांनी आपल्या हयातीतच नामनिर्देशनावर स्वाक्षरी करुन ते संस्थेला सादर केलेले असावे. सह सभासदांचया बाबतीत, प्रत्येक सभासदांच्या भागहिश्यानुसार स्वतंत्र नामनिर्देशन सादर करण्यात येईल.

२) संस्थेचया व उपविधीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रक्रियेचा अवलंब करुन सादर केलेले कोणतेही नामनिर्देशन नविन नामनिर्देशन अर्ज करुन रद्द करण्यात येईल किंवा बदलण्यात येईल.

**१०६सी-९ नामनिर्देशनांची नोंदणी :**

तातपुरत्या सभासदत्वाच्या प्रयोजनार्थ त्याचबरोबर कोणताही अर्ज रद्द करण्यासाठी किंवा बदलण्यासाठी प्रत्येक व्यक्तीचे नाव व पत्ता नियम ३२ अन्वये ठेवण्यात आलेल्या नोंदवहीमध्ये नोंदविण्यात येईल.

**१०६सी-१० मर्यादित जबाबदारीसह संस्थेला कर्ज घेण्यासाठी अटी :**

कोणतीही गृहनिर्माण संस्थेवर देणी तिच्या भरणा केलेल्या भाग भांडवलाच्या, संचित राखीव निधीच्या, जमिन व इमारतीसाठी सभासदांनी अंशदान केलेला निधी, आणि इमारत निधीच्या वजा संचित तोटयाच्या दहापटींची मर्यादा ओलांडणार नाही.

परंतु पुनर्विकासाच्या वेळी, गृहनिर्माण संस्था, शासन मान्यता प्राप्त मुल्यनिर्धारक यांच्याकडुन संस्थेने प्राप्त केलेल्या मूल्यांकन अहवालानुसार, जमिनीच्या मूल्याच्या दहापट मूल्याचे कर्ज घेऊ शकेल.

**१०६सी-११ निधी उभारणी :**

संस्था संचालक मंडळाने मान्यता दिल्याप्रमाणे पुढील निधीची स्थापना (उभारणी) व जतन करील.

१) **राखीव निधी :-** संस्था, राखीव निधीची स्थापना (उभारणी) करु शकेल व त्यामध्ये.

अ) संस्थेला तिच्या सभासदांकडुन प्राप्त झालेले प्रवेश शुल्क ,

ब) संस्थेच्या सभासदत्वाचे हस्तांतरण केल्यावर संस्थेला तिच्या सभासदांकडुन सर्व प्राप्त झालेले हस्तांतरण शुल्क,

क) कलम ६६ च्या पोटकलम (१) व (२) च्या तरतुदींच्या अधीन राहुन, त्यावषा्रच्या शिल्लक निधीतुन किंवा निव्वळ नफ्यातुन या निधीस वितरीत करण्यात आलेली रक्कम,

ड) विनिर्दिष्ट प्रयोजनासाठी जमा केलेल्या देणग्यां व्यतिरिक्त संस्थेला प्राप्त झालेल्या देणग्या.

२) **कर्ज निवारण निधी :-** संस्था कर्ज निवारण निधी उभारील व त्यामध्ये वास्तुविशारदाने प्रमाणित केलेला आणि इमारतीचया बांधकामावेळी झालेल्या प्रत्येक सदनिकेच्या बांधकाम मुल्याच्या प्रतिवर्ष किमान ०.२५ टक्के दरास अधीन राहुन, संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये निश्चिम केलेल्या दराने तिच्या सभासदांकडुन जमा केलेल्या अंशदानाचा समावेश असेल. हा निधी, संचालक मंडळाने मान्यता दिलेल्या मोठया देखभाल दुरुस्त्यांसाठी वापरण्यात येईल.

३) **दुरुस्ती व देखभाल निधी :-** संस्था देखभाल व दुरुस्ती निधीची स्थापना करील यामध्ये, वास्तुविशारदाने प्रमाणित केलेला आणि इमारतीच्या बांधकामावेळी झालेल्या प्रत्येक सदनिकेच्या बांधकाम मुल्याच्या प्रतिवर्ष किमान ०.७५% टक्के दरास अधीन राहुन,

सर्वसाधारण सभेच्या बैठकीमध्ये निश्चित केलेल्या दराने तिच्या सभासदांकडुन जमा केलेल्या अंशदानाचा समावेश असेल. हा निधी संस्थेच्या इमारती किंवा मालमत्तांच्या नियमित आवर्ती दुरुस्त्यांचा खर्च भागविण्यासाठी वापरला जाईल.

४) **मोठी दुरुस्ती निधी :-** संस्था मोठया दुरस्ती निधीची स्थापना करील यामध्ये सर्वसाधारण सभेने ठरविलेल्या आणि आवश्यक असेल तेव्हा व त्याप्रमाणे क्षेत्रावर आधारित यथाप्रमाणे निश्चित केलेल्या दराने तिच्या सभासदांकडुन जमा केलेल्या अंशदानाचा समावेश होईल. मोठी दुरुस्ती निधी संस्थेच्या इमारती व मालमत्तांच्या महत्वपूर्ण दुरुस्त्या व देखभालीच्या कामासाठी वापरण्यात येईल.

५) **शिक्षण व प्रशिक्षण निधी :-** संस्था, शिक्षण व प्रशिक्षण निधीची स्थापना करील यामध्ये तिच्या सभासदांकडुन जमा केलेल्या अंशदानाचा समावेश असेल.

६) **निवडणूक निधी :-** संस्था, निवडणूक निधीची स्थापना करील यामध्ये तिच्या सभासदांनी जमा केलेल्या अंशदानाचा समावेश असेल. संस्था सर्वसाधारण सभेने ठरविल्याप्रमाणे, व्यवस्थापन समितीच्या निवडणूका घेण्यासाठी सर्व सभासदांकडुन समान अंशदान जमा करील.

७) **कल्याण निधी :-** संस्था, कल्याण निधीची स्थापना करील यामध्ये सभासदांकडुन जमा करण्यात आलेल्या समान अंशदानाचा समावेश होईल. कल्याण निधी, संस्थेने आयोजित केलेल्या सामाजिक, सांस्कृतिक व मनोरंनात्मक कार्यक्रमासाठी वापरण्यात येईल.

८) **मूळ निधी :-** संस्था, मूळ / कॉर्पस निधी जतन करील.

९) **सर्वसाधारण सभेच्या परवानगी सह उभारावयाच्या इतर कोणताही निधी :** संमतीस अधीन राहुन सर्वसाधारण सभेच्या तिच्या सर्व सभासदांकडुन सम प्रमाणात योगदान घेवुन एखादया विशिष्ट प्रयोजनार्थ अतिरिक्त रक्कमेचा प्रस्तावित निधी उभा करु शकते.

**१०६सी-१२ शुल्क आकारणी :**

१) निधी आणि त्यामध्ये नमुद करण्यात आलेले विशिष्ट दर याकामी संस्थेचे सभासद किंवा गाळा धारक यांच्याकडुन जमा केले जाणारे योगदान खालील प्रमाणे

अ) सेवा शुल्क.

ब) मालमत्ता कर.

क) पाणी पट्टी.

ड) संस्थेचे उद्वहनाची दुरुस्ती आणि देखभालीसाठी होणारा खर्च ज्यामध्ये उद्वहन चालविण्यासाठी होणाऱ्या खर्चाचाही समावेश होतो.

ई) मोटार वाहनमळ शुल्क

फ) थकित शुल्कावरील व्याज, विलंबाने होणाऱ्या आकारणीवरील व्याज,

ग) कर्जाच्या पतर फेडीपोटीचा हप्ता आणि व्याज.

ह) ना-भोगवटा शुल्क.

आय) विमा शुल्क.

ज) भाडे पट्ट्याचेभाडे, पट्ट्यापोटीचे भाडे

के) बिनशेती कर, बिगरशेती कर.

ल) संस्थेमार्फत निर्मित करण्यात आलेल्या विविध निधीतील योगदान.

म) सर्वसाधारण सभेत मंजुर करण्यात आलेले इतर कोणतेही शुल्क, मात्र, असे शुल्क अधिनियम आणि नियमांमधील तरतुदींच्या विरोधी नसावेत.

**२) उप-नियम (१) मध्ये नमुद करण्यात आल्याप्रमाणे संस्थेच्या सेवा शुल्कामध्ये खालील बाबींचा समावेश होतो :-**

अ) कर्मचारी वर्ग, उद्वहन चालक, सुरक्षा रक्षक, माळी आणि संस्थेचे इतर कोणतेही कर्मचारी यांचा पगार.

ब) ज्या ठिकाणी संस्थेचे स्वतंत्र कार्यालय आहे तेथे, मिळकत कर, वीज आकार, पाणी पट्टी वगैरे सारखे खर्च.

क) छपाई लेखन सामग्री, टपाल खर्च, स्टेशनरी आणि पोस्टाचा खर्च.

ड) संस्थेच्या कार्यकारी समितीतील सदस्य आणि संस्थेचे कर्मचारी यांचा प्रवास भत्ता आणि वाहन खर्च.

ई) संस्थेच्या समितीतील सदस्यांना दिली जाणारी बैठक शुल्क

फ) संस्था ज्यांचेशी संलग्न आहे अशा गृहनिर्माण संघ आणि इतर कोणतेही सहकारी संस्था यांची वार्षिक वर्गणी.

ग) गृहनिर्माण संघ आणि इतर कोणतीही सहकारी संस्थेशी संलग्न होणेकामी अदा करावयाचे प्रवेश शुल्क.

ह) अंतर्गत वैधानिक पूर्न-लेखापरीक्षण आणि चाचणी लेखापरीक्षण, असल्यास त्याचे शुल्क

आय) सर्वसाधारण सभा, समिती आणि उप-समिती, असल्यास, त्यांच्या सभा यासाठी होणारा खर्च.

ज) प्रतिधारण शुल्क, कायदेशीर शुल्क, प्रादेशिक चौकशी शुल्क.

के) सामाईक वीज आकार.

३) **खर्चाची वाटणी :-** समितीने संस्थेवरील खर्च प्रत्येक सभासद किंवा युनिट किंवा सदनिका धारक यांमध्ये वाटुन खाली दिलेल्या बाबीनुसार संविभाजित करील.

| अ.क्र. | आकार | विभाजनाचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | सेवा शुल्क | युनिट्स / सदनिकांच्या संख्येनुसार समान विभागणी |
| २ | मालमत्ता कर | स्थानिक प्राधिकरणाने निश्चित केल्याप्रमाणे आणि सामाथिक क्षेत्रासाठी प्रत्येक युनिट किंवा सदनिकेच्या चटई क्षेत्राच्या आधारे. |
| ३ | पाणी पट्टी | सक्षम प्राधिकरणाने मंजुर केलेल्या बांधकाम आराखडयानुसार, प्रत्येक सदनिकेत देण्यात |

| | | |
|---|---|---|
| | | आलेल्या निवेशिकांची आणि नळांचे व त्यांचा आकार एकुण याआधारे. |
| ४ | उद्वानाच्या देखभाल आणि दुरुस्तीचा खर्च तसेच संस्थेचे ते उद्ववाहन चालु करण्याचा अंतर्भुत खर्च | युनिटांचया सदनिकांच्या आधारे ज्या इमारतीत उद्ववाहन आहे तेथील युनिटांच्या सदनिकांच्या संख्येत समान विभागणी करुन. |
| ५ | वाहनतळ आकार | सर्वसाधारण सभेद्वारे निश्चित केलेल्या दरानुसार . |
| ६ | थकित शुल्कावरील व्याज | साधारण सभेद्वारे निश्चित केलेल्या दराप्रमाणे १२% दरसाल सरळव्याज पेक्षा जास्त नसेल. |
| ७ | कर्ज आणि व्याजाच्या हफ्त्यांच्या परतफेड | वित्तीयय अभिकरणाने निश्चिम केल्याप्रमाणे प्रत्येक रक्कम हफ्त्याची व्याजास. |
| ८ | भोगवटेतर शुल्क | सेवा शुल्काच्या १०% |
| ९ | विमा शुल्क | प्रत्येक सदनिकेच्या चटई क्षेत्रानुसार परंतु असे की, वाणिज्यीक प्रयोजनांसाठी सदनिका किंवा युनिटचा वापर केल्यामुळे कोणताही विनिर्दिष्ट मालाचा साठा करण्यासाठी विम्याचा हफ्ता वाढत असेल तर, असा विम्याच्या हफ्त्याचा अतिरिक्त भार हा ने कोण सदनिकाधारक त्यांच्या सदनिकांया चटई क्षेत्राच्या प्रमाणात वाढीव हफ्ता देण्यास जबाबदार असतील त्यांच्यामध्ये संविभाजित होईल. |
| १० | भाडेपट्टा | प्रत्येक युनिट / सदनिकेचे चटई क्षेत्र |
| ११ | यासाठीचे अंशदान | |
| | एक) कर्ज निवाराण निधी | सर्वसाधारण सभेने निश्चित केलेल्या दराने, प्रत्येक युनिट सदनिकेच्या बांधकाम खर्चाच्या किमान ०.२५% या प्रतिवर्ष असेल. |
| | (दोन) दुरुस्ती आणि देखभाल निधी | सर्व सदस्य मंडळाने निश्चित केलेल्या दराने, प्रत्येक युनिट सदनिकेच्या बांधकाम खर्चाच्या किमान ०.७५% प्रतिवर्ष असेल. |
| | (तीन) मोठया दुरुस्त्यांसाठीचा निधी | प्रत्येक युनिट / सदनिकेच्या चटई क्षेत्रफळानुसार |
| | (चार) शैक्षणिक आणि प्रशिक्षण निधी | दहा रुपये प्रति सभासद किंवा सरकारने प्रत्येक सभासदासाठी वेळोवेळी निश्चित केलेल्या दरानुसार पैकी जो जास्त असेल तितक. |
| | (पाच) निवडणूक निधी | सभासदांकडुन समानतेने |
| | (सहा) कल्याण निधी | सभासदांकडुन समानतेने |
| | (सात) इतर निधी | सभासदांकडुन समानतेने |
| | (आठ) सुख सुविधा आकारणी | क्लब हाऊस, क्लबचे सभासद , व्यायामशाळा, जलतरण तलाव यापैकी सभासदांच्या या सुविधांच्या वापर करण्यानुसार |

| | | |
|---|---|---|
| | (नऊ) क्रिडांगण, उद्यान, धावमार्ग | युनिट्स किंवा सदनिकेंच्या संख्येत समान वितरण |

**१०६क-१३ गृहनिर्माण संस्थांचे व्यवस्थापन :**

**१) आदर्श उपविधी स्वीकृती आणि प्रशासन :-**

अ) प्रत्येक गृहनिर्माण संस्था आदींचे व्यवस्थापन निबंधकाने मंजुर केलेल्या संस्थेच्या उपविधीमार्फत शासित केले जाईल. संस्थेच्या उपविधीमार्फत संस्थेचा मुख्य शासन आराखडा तयार केला जावा.

ब) प्रत्येक गृहनिर्माण संस्था, सहकारी संस्थांचा संघ किंवा सहकारी गृहनिर्माण संस्था आदीं व निबंधकाने नमुना उपविधी प्रकाशित केल्यापासुन तीन महिन्यांच्या आत स्वीकृत करावे.

**२) व्यवस्थापन समितीची कार्ये आणि कर्तव्ये :-**

अ) व्यवस्थापकीय समितीने सर्वसाधारण सभेने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करणे, वार्षिक अर्थसंकल्प तयार करणे, वित्तीय नोंदी ठेवणे आणि वेळोवेळी लेखापरीक्षा सुनिश्चित करणे, संस्थेच्या मालमत्तेची दुरुस्ती आणि देखभाल करणे.

ब) समिती सर्व सदस्य मंडळाची मान्यता घेईल, व्यवसायिकांची नेमणूक जसे की, वास्तुशास्त्रज्ञ, कंत्राटदार इ. संस्थेचे प्रकल्प आणि संस्थेच्या प्रयोजनासाठी.

क) समितीने हेही सुनिश्चित करावे की संस्था स्वीकारलेल्या नमुना उपविधीचा स्वीकार करेन आणि नमुना उपविधी नुसार कर्तव्यांचे पालन करेन.

**३) सर्व सदस्स संघ :-**

अ) सर्व सदस्य संघ हे संस्थेत सर्वोच्च निर्णयकारी प्राधिकरण आणि त्यांचे निर्णय हे व्यवस्थापकिय समितीवर बंधनकारक असतील जे त्या निर्णयांची अंमलबाजवणी करण्यासाठी जबाबदार आहे.

ब) सर्व सदस्य संघाकडे अधिनियम, नियम उपविधी आणि शासनाने निदेशक तत्वे या अधिनियमाच्या कलम ७९अ अन्वये त्यांच्या अधिकारीते अंतर्गत प्रकरणे मिटवण्याचा अधिकार असेल.

क) अधिनियमातील कलम ७५ अन्वये केलेल्या तरतुदीनुसार प्रत्येक वर्षी वार्षिक सर्वसाधारण सभा भरवण्यात यावी.

ड) वार्षिक सर्वसाधारण सभेची सुचना आणि कार्यसुची अधिनियमातील तरतुदीनुसार असावी.

ई) सर्वसाधारण सभेची गणपूर्ती ही एकुण सदस्यांच्या दोन तृतीयांश किंवा २० सदस्य पैकी जे कमी असेल ते.

फ) अर्ध्या तासामध्ये जर गणपूर्ती होत नसेल तर तद्नंतर संस्थेची सर्वसाधारण सभा भरवण्यात येईल. आणि जर सदस्यांची मागणी करणारी बैठक बोलवल्यास तिचे विसर्जन करावे. अन्य कोणत्याही प्रकरणात सभा सर्वसाधारण सभेच्या सुचनेत विनिर्दिष्ट

केल्याप्रमाणे नंतरच्या तासापर्यंत त्याच दिवशी, त्याच ठिकाणी पुढे ढकलण्यात येईल, किंवा पुढील तारीख द्यावी जी सात दिवसांच्या अगोदरची नसेल आणि तीस दिवसांपेक्षा पुढची नसेल. आणि अशा सर्वसाधारण सभेमध्ये, मुळ सर्वसाधारण सभेच्या कार्यसुचीमध्ये जे कार्य होते ते चालवले जाईल, जरी आवश्यक गणपूर्ती होत असेल किंवा नसेल. जे व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे उपस्थित असणाऱ्या सभासदांसह, संस्थेतील उपस्थित असणाऱ्या एकुण सभासदांच्या एकावन्न टक्के मताधिक्याने, वार्षिक सर्वसाधारण सभेत निर्णय संमत करण्यात येईल.

ग) नियमित बाबींसाठी पाच पूर्ण दिवसांची नोटीस देऊन विशेष सर्वसाधारण सभा बोलविता येईल.

ह) पुनर्विकासाच्या बाबींसाठी, जसे की, विकासक किंवा कंत्राटदार यांची निवड करण्यासाठी, चौदा पूर्ण दिवसांच्या कालावधीची नोटीस देणे अनिवार्य आहे आणि पुनर्विकासाच्या संबंधात विशेष सर्वसाधारण सभेची गणपूर्ती ही, संस्थेच्या एकुण सदस्यांच्या दोन तृतीयांश इतकी असेल. अशी सभा निबंधकाच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत आयोजित करण्यात येईल. पुनर्विकासाच्या सभेचे व्हिडीओ रेकॉर्डींग करण्यात येईल आणि ते सभापतीच्या अभिरक्षेत ठेवण्यात येईल आणि त्याची आणखी एक प्रत, ज्याच्या अधिकारक्षेत्रात संस्था स्थित आहे त्या सहकारी संस्थेच्या उपनिबंधकाच्या कार्यालयामध्ये ठेवण्यात येईल.

ळ) पुनर्विकासासाठी विकासकाच्या किंवा कंत्राटदाराच्या निवडीचा ठराव, संस्थेच्या एकुण सभासदांच्या एकावन्न टक्के मताधिक्याने संमत करण्यात येईल.

**४) समितीतील नैमित्तीक रिक्त पदे :-**

अ) सभासदाचा मृत्यु, राजीनामा, अनर्हता, पदावरुन दुर करणे किंवा असमर्थता अथवा त्याचा पदावधी संपण्यापूर्वी इतर कोणत्याही कारणामुळे समितीमध्ये नैमित्तीक पद रिक्त झाल्यावर जे व्यवस्थापन समितीद्वारे भरण्यात येईल.

ब) सचिव किंवा अधिकृत व्यक्ती संस्थेच्या नोटीस फलकावर सात दिवसांची नोटीस देऊन सभासदांकडुन नाम निर्देशने मागवील.

क) नामनिर्देशनांची छाननी केल्यानंतर, वैध नामनिर्देशन समितीसमोर ठेवील.

ड) रिक्त पदांपेक्षा वैध नामनिर्देशनांची संख्या अधिक असल्यास, समिती मताधिक्याने रिकत पदे भरण्यात येतील.

इ) स्वीकृत सदस्याचा पदावधी हा समिती सदस्यांच्या पदावदीशी इतकाच असेल.

५) देखभाल व दुरुस्ती :-

अ) संस्थेच्या मालमत्तेची देखभाल व दुरुस्ती करण्यास व्यवस्थापन समिती जबाबदार असेल.

ब) व्यवस्थापन समिती एका वित्तीय वर्षामध्ये संस्थेच्या मालमत्तेच्या दुरुस्ती व देखभालीवर खर्च करण्यासाठी जबाबदार असेल, त्यात एका वेळी.

१ ते २५ सभासदांसाठी १,००,०००/- रुपयांपेक्षा

२६ ते ५० सभासदांसाठी २,००,०००/- रुपयांपेक्षा आणि,

५१ ते त्यावरील सभासदांसाठी ३,००,०००/- रुपयांपेक्षा

अधिक खर्चास तरतुद नसेल.

**१०६क-१४ कलम १५४ब-२९ अन्वये वसुलीचे प्रमाणपत्र देणे :**

१) **वसुलीचे प्रमाणपत्र देण्यासाठी अर्ज :**

अ) कलम १५४ब-२९ अन्वये वसुलीचे प्रमाणपत्र देण्यासाठी प्रत्येक अर्ज, शंभर रुपयांच्या न्यायालय शुल्कासह सादर करण्यात येईल.

ब) ज्याला रक्कम देय आहे, त्या व्यक्तींकडुन संस्थेने दावा केलेली देय रक्कम अर्जामध्ये विनिर्दिष्ट केली पाहिजे.

क) जिच्यावर रकमेचा दावा केला आहे, ती संस्थेचा सभासद आहे किंवा नाही ते अर्जामध्ये स्पष्ट असेल.

२) **अर्जासोबत :-**

अ) अर्ज सादर करण्यासाठी आणि निबंधकासमोर संस्थेचे ति निधीत्व करण्यासाठी एखादा अधिकारी किंवा हक प्रतिनिधी यास प्राधिकृत करण्यासाठीचे प्राधिकरणाचे पत्र.

ब) देय रकमांच्या किंवा कसुरदार सदस्यांच्या किंवा भोगवटादाराच्या वैयक्तिक खातेवहीची अद्ययावत प्रमाणित सत्यप्रत.

क) मुख्य दुरुस्ती निधी किंवा बांधकाम खर्चाची वसुली करण्यास मान्यता देणाऱ्या ठरावाची प्रमाणित सत्यप्रत.

ड) देय रकमांवरील सरळ व्याजीच्या वसुलीस मान्यता देणाऱ्या ठरावाची प्रत प्रमाणित सत्यप्रत.

फ) संस्थेने दिलेल्या नोटीशीची प्रत

३) अर्जाची छाननी व नोंदणी :-

अ) अर्ज प्राप्त झाल्यावर, निबंधक, नोंदणीची कार्यवाही करण्यापूर्वी अर्ज परिपूर्ण असल्याची खात्री करील.

ब) जर अर्ज अपूर्ण असेल तर, निबंधक, संस्थेस सात दिवसांच्या आत अर्जातील कमतरता दुरुस्त करण्याचे निर्देश देईल.

क) अर्जातील कमतरता दुर केल्यानंतर, अर्जाची नोंदणी करण्यात येईल. जर अर्जामधील कमरता विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत पूर्ण केल्या नाहीत तर, निबंधक असा अर्ज फेटाळील.

ड) नोंदणी, निबंधक, पंधरा दिवसांच्या आत, प्रतिवादीस विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे विनिर्दिष्ट दिवशी अशा दिनांकास व ठिकाणी दाखल करण्याचे आवश्यक करणारी लेखी विवरणपत्र नोटीस प्रतिवादीस देईल.

इ) नोटीस हात बटवडयाने किंवा रितसर पोचपावती असलेल्या नोंदणीकृत टपालाने देण्यात येईल किंवा जर, प्रतिवादी सहजपणे सापडत नसेल तर किमान एका स्थानिक दैनिक वर्तमानपत्रात सार्वजनिक नोटीस प्रसिध्द करण्यात येईल.

फ) अशा सार्वजनिक नोटिशीस दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ च्या तरतुदीनुसार योग्य त्या फेरफरांसह लागु होतील.

ग) नोटीस प्रसिध्द करण्याचा खर्च अर्जदारांकडुन भागविण्यात येईल.

४) **पक्षांची उपस्थिती आणि अनुपस्थितीचे परिणाम :-**

अ) पूर्वोक्ताप्रमाणे निश्चित केलेल्या दिनांकास, प्रतिवादी एकतर व्यक्तीश: किंवा त्यांच्या वकीलामार्फत किंवा त्यांच्या प्रतिनिधीद्वारे निबंधकासमोर उपस्थित होईल. आणि त्याच्या बचावासाठी लेखी विवरणपत्र दाखल करील. निबंधक, लेखी विवरणपत्र सादर करण्यासाठी प्रथमत: पंधरा दिवसांपेक्षा जास्त नसेल इतक्या कालावधीसाठी स्थगिती देऊ शकेल.

ब) सुनावणीच्या दिनांकास, जर अर्जदार उपस्थित असेल आणि प्रतिवादी पक्षकार किंवा प्रतिवादी पक्षकार जर हकापेक्षा अधिक असतील तर त्यांच्यापैकी कुणीही उपस्थित नसेल किंवा उपस्थित राहिले नाही, तर यथास्थिती, निबंधक, स्वत: सर्व प्रतिवादी पक्षकारांना रीतसर नोटीस देण्यात आल्याची सुनिश्चिती केल्यानंतर अर्जदारास, पुढील दिनांकास दावा सिध्द करण्याचा आदेश देईल व अर्जावर एकतर्फी निर्णय घेईल.

परंतु अर्जावर निर्णय घेण्यापूर्वी, जर प्रतिवादी उपस्थित झाला आणि अगोदरच्या वेळी त्याच्या अनुपस्थिती बाबतची पुरेसे कारण त्याने दाखविल्यास, जणुकाही तो निबंधकासमोर पहिल्या दिवशी उपस्थित झाला होता असे समजुन या प्रकरणी त्याचे म्हणणे ऐकुन घेण्यात येईल.

क) जर, सुनावणीसाठी निश्चित केलेल्या दिनांकास, प्रतिवादी उपस्थित असल्यास व अर्जदार अनुपस्थित राहिल्यास,-

i. निबंधक, प्रतिवादी कबुल केल्याप्रमाणे वसुली प्रमाणपत्र निर्गमित करील.

ii. अर्जदाराची अनुपस्थिती ही दावा फेटाळण्याचे कारण असताकामा नये व निबंधक, गुणवत्तेवर अर्जावर निर्णय देईल.

**१६) मुख्य नियमांच्या नियम १०७ मधील पोट-नियम (१) या खंड (ड) मध्ये :**

१) किंवा कलम १३७ याच्या पोट-कलम (१) अन्वये या मजकुरानंतर किंवा कलम १५४ब-२९ याच्या पोट-कलम (१) व (२) हा मजकुर समाविष्ट करण्यात येईल.

२) परंतुका मध्ये कलम १०१ याच्या पोट-कलम (१) किंवा (२) अन्वये या मजकुरानंतर किंवा कलम १५४ब-२९ याच्या पोट-कलम (१) व (२) हा मजकुर दाखल करण्यात येईल.

१७) मुख्य नियमांना जोडलेले ज-१ व ज-२ नमुने वगळण्यात येतील.

१८) मुख्य प्रधान नियमांना जोडलेले म-१ व म-९ नमुने वगळण्यात येतील.

१९) मुख्य प्रधान-नियमांना जोडलेले नमुना म-नंतर, खालील नमुने जादा दाखल करण्यात येतील.

**नमुना वाय-१**
**(नियम १०६ ग - २ (१) पहा)**

**प्रस्तावित सहकारी गृहनिर्माण संस्थांचे नाव राखुन ठेवणे व बँक खाते उघडण्यासाठी परवानगीसाठी अर्जाचा नमुना**

प्रति,

सह / उप / सहायक निबंधक,

सहकारी संस्था,

-------------------------------,

विषय : **प्रस्तावित सहकारी गृहनिर्माण संस्थेचे नाव राखुन ठेवणे व बँक खाते उघडणेबाबत.**

महोदय,

मी आपणांस कळवू इच्छितो की, ------------------------------------------------------------------ ------------------------------- या सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, (प्रस्तावित) याचा मुख्य प्रवर्तक म्हणुन माझी निवड झाली आहे. दिनांक / / रोजी --------------------------- येथे झालेल्या प्रस्तावित संस्थेच्या प्रवर्तकांकडुन माझी मुख्य प्रवर्तक म्हणुन निवड झालेल्या ठरावाची प्रमाणित सत्यप्रत सोबत जोडत आहे. प्रवर्तकांच्या उक्त सभेमध्ये संमत करण्यात आलेल्या ठराव क्र. ------------------ च्या आधारे माझ्याकडे विहित असलेल्या अधिकारानुसार मी -------------------------------------------------------------- सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, (प्रस्तावित) हे नाव राखुन ठेवण्यासाठी हा अर्ज करीत आहे.

वरील प्रस्तावित नाव राखुन ठेवण्यासाठी उपलब्ध नसल्यास पुढील पर्यायी नावांपैकी कोणतेही नाव पसंती क्रमानुसार राखुन ठेवावे.

१) ----------------------------------------------------

२) ----------------------------------------------------

३) ----------------------------------------------------

४) ----------------------------------------------------

राखुन ठेवण्यासाठी आवश्यक माहिती पुढील प्रमाणे :

१) राखुन ठेवण्यासाठी सहकारी संस्थेचे प्रस्तावित केलेले नाव :

२) भुखंडाचा तपशिल : ज्यावर इमारत बांधणे प्रस्तावित किंवा जी आधीच बांधलेले आहे असे ठिकाण व महानगरपालिकेचा प्रभाग यांसारखा

३) पत्र व्यवहाराच्या प्रयोजनासाठी टपालाचा पत्ता :

४) ईमेल तपशिल :

५) जमिनीचा तपशिल मगती संपादित केलेली असो किंवा संपादित करणे प्रस्तावित केलेले असो.

६) बांधकामासाठी प्रस्तावित किंवा आधीच बांधलेल्या सदनिकांची संख्या :

७) प्रस्तावित सहकारी संस्थेला आधीच सामील झालेल्या प्रवर्तकांची संख्या

८) अर्जदार हा प्रस्तावित संस्थेच्या प्रवर्तकापैकी एक आहे किंवा कसे :

९) प्रस्तावित सहकारी संस्थेचा पत्ता :

१०) मुख्य प्रवर्तकाचा तपशिल :

अ) मुख्य प्रवर्तकाचे संपूर्ण नाव, व्यवसाय व पत्ता :

ब) निवासाचा पत्ता :

क) कामधंदा / नोकरी :

ड) व्यवसाय :

इ) भ्रमणध्वनी क्रमांक :

मी याद्वारे पुढील कागदपत्रे जोडत आहे :

१) सहकारी संस्थेचया प्रवर्तकांच्या ठरावाची प्रत

२) भाडेकरु सह-भागीदारी गृहनिर्माण संस्था किंवा संस्थेची जागा विकासकाच्या प्रवर्तकाने कोणत्याही एका प्रस्तावित सदस्याशी केलेल्या कराराची प्रत, बांधकामास प्रारंभ झाल्याच्या प्रमाणपत्राची प्रत किंवा वास्तुविशारदाने प्रमाणित केलेले इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

३) भाडेकरु स्वमालकीची गृहनिर्माण सहकारी संस्था असल्यास जमीन विक्रीसाठीच्या कराराची प्रमाणित प्रत किंवा जमीन विक्रीसाठी विक्रेत्याकडुन संमतीपत्र, किंवा शासनाने आश्वासन पत्र आणि वास्तुविशारदाने प्रमाणित केलेल्या संभाव्य आराखडयाची प्रत किंवा मंजुर आराखडयाची प्रत.

मी असे जाहीर करतो की, सहपत्रांसह वर दिलेली माहिती, सत्य आहे.

मी आपणांस विनंती करतो की, वरील नाव राखुन ठेवण्याची आणि त्यानुसार गृहनिर्माण संस्थेचे बँक खाते उघडण्यास परवानगी द्यावी.

आपला विश्वासु

दिनांक :

ठिकाण : (मुख्य प्रवर्तकाचे नाव व स्वाक्षरी)

**नमुना वाय-२**
**(नियम १०६ क - २ (२) पहा)**

**प्रस्तावित सहकारी संस्था संघाचे किंवा सहकारी गृहनिर्माण संघाचे नाव राखुन ठेवण्यासाठी आणि बँक खाते उघडण्यासाठी अर्जाचा नमुना**

प्रति,

सह / उप / सहायक निबंधक,

सहकारी संस्था,

-------------------------------,

विषय : **प्रस्तावित सहकारी संस्था संघाचे नाव आरक्षित करणेबाबत आणि बँक खाते उघडणेबाबत.**

महोदय,

मी आपणांस कळवु इच्छितो की, मी -------------------------------------------------------------------- -- सहकारी संस्थाचा संघाचा / सहकारी गृहनिर्माण संघाचा (प्रस्तावित) मुख्य प्रवर्तक म्हणुन निवडुन आलो आहे. मला मुख्य प्रवर्तक म्हणुन निवडण्यासाठी दिनांक / / रोजी --------------- वाजता घेतलेल्या साधारण सभेच्या इतिवृत्ताची आणि प्रस्तावित सहकारी संस्था संघाच्या / सहकारी गृहनिर्माण संघाच्या साधारण सभेला जे पदाधिकारी उपस्थित होते. त्या पदाधिकाऱ्यांच्या यादीची प्रमाणित सत्यप्रत यासोबत जोडली आहे. पदाधिकाऱ्यांच्या उक्त सभेमध्ये संमत केलेल्या ठराव क्रमांक ---------------- याच्या आधारे माझ्याकडे विहित असलेल्या अधिकारानुसार, मी ------------------------------------- सहकारी संस्था संघाचे / सहकारी गृहनिर्माण संघाचे (प्रस्तावित) ---------------------------- हे नाव राखुन ठेवण्यासाठी हा अर्ज करीत आहे.

वरील प्रस्तावित नाव राखुन ठेवण्यासाठी उपलब्ध नसल्यास, पसंतीक्रमानुसार, पुढील पर्यायी नावांपैकी कोणतेही एक नाव राखुन ठेवणे.

१) ---------------------------------------
२) ---------------------------------------
३) ---------------------------------------
४) ---------------------------------------

नाव राखुन ठेवण्यासाठी आवश्यक माहिती पुढीलप्रमाणे :-

१) राखुन ठेवण्यासाठी संस्था संघाचे / सहकारी गृहनिर्माण संघाचे प्रस्तावित / नियोजित केलेले नाव :-------
२) तो त्याच्या आराखडयाचा (लेआऊट) किंवा भुखंडाचा भाग असेल त्या वैयक्तिक सोसायटयांचा / संस्थांचा किंवा कायदेशीर मंडळांचा तपशिल.
३) पत्र व्यवहाराच्या प्रयोजनासाठी टपालाचा पत्ता :
४) ई-मेल तपशिल :
५) आवश्यक कागदपत्रांवर स्वाक्षरी करुन दोन पदाधिकाऱ्यांनी संमती दिलेल्या किंवा अधिकार दिलेल्या सहकारी संस्थांचा किंवा कायदेशीर मंडळांचा तपशिल :
६) संघ बनणाऱ्या सहकारी संस्थांचा किंवा कायदेशीर मंडळांचा क्रमांक :

७) जे पदाधिकारी प्रस्तावित संघात सामील झाले आहेत त्यांची संख्या :

८) अर्जदार प्रस्तावित संघाचा पदाधिकाऱ्यांपेकी एक पदाधिकारी आहे किंवा कसे? :

९) प्रस्तावित संघाचा पत्ता :

१०) मुख्य प्रवर्तकाचा तपशिल :

अ) मुख्य प्रवर्तकाचे पूर्ण नाव, व्यवसाय व पत्ता :

ब) निवासाचा पत्ता :

क) कामधंदा / नोकरी :

ड) व्यवसाय :

इ) भ्रमणध्वनी क्रमांक :

मी याद्वारे पुढील कागदपत्रे जोडत आहे :

१) साधारण सभेच्या इतिवृत्ताची प्रत आणि जे पदाधिकारी साधारण सभेला उपस्थित होते त्यांची यादी

२) प्रस्तावित संस्थेच्या संघाच्या पाच संस्थांच्या साधारण सभेतील ठरावाची किंवा दोन संस्थांच्या साधारण सभेच्या ठरावाची किंवा साधारण सभेला उपस्थित असणाऱ्या दोन पदाधिकाऱ्यांना प्राधिकृत करण्यासाठी प्रस्तावित सहकारी गृहनिर्माण संघाच्या कायदेशीर मंडळांच्या संमतीची व आवश्यक कागदपत्रांच्या स्वाक्षरीची प्रत.

३) अशा वैयक्तिक संस्थेच्या किंवा कायदेशीर मंडळाच्या नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.

४) वैयक्तिक संस्था किंवा कायदेशीर मंडळे त्याच आराखडयाचा (लेआऊट) किंवा भुखंडाचा भाग आहे, ते वास्तुशास्त्रज्ञाकडुन प्रमाणित होणाऱ्या प्रमाणपत्राची प्रत.

मी घोषित करतो की, वर दिलेली माहिती, सह पत्रासंह अचुक आहे.
मी आपणांस वरील नाव राखुन ठेवण्याची विनंती करतो आणि त्यानुसार प्रस्तावित संस्था संघाचे बँक खाते उघडण्यासाठी परवानगी द्यावी.

आपला विश्वासु

दिनांक :

ठिकाण : (मुख्य प्रवर्तकाचे नाव व स्वाक्षरी)

**नमुना वाय-३**

**(नियम पहा १०६ क-२ (४))**

**प्रस्तावित गृहनिर्माण संस्थेच्या नावाच्या आरक्षणासाठी आवेदनपत्र नोंदणी**

| अनुक्रमांक | अर्जदाराद्वारे विनंती केलेल्या प्रस्तावित गृहनिर्माण संस्थेचे नाव | ठिकाण गाव / प्रभाग / तालुका आणि जिल्हा | पावतीचा दिनांक | अभिस्वीकृतिचा दिनांक पोच पावतीचा | डाक / हात बटवडयाने इलेक्ट्रॉनिक माध्यमामधुन प्राप्त | आरक्षित नाव | परवानगी मिळाल्याचा दिनांक | अर्ज नाकारण्याचा | अधिदान आणि संबधित अधिकाऱ्याची स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | | | | | | |

**नमुना वाय-४**

**(नियम १०६ क - ३ (१), १०६ क-५ (एक) आणि १०६क-६ (१))**

**नामनिर्देशित व्यक्तीकडुन तात्पुरत्या सभासदत्वासाठीच्या अर्जाचा नमुना**

प्रति,
मा.सचिव,
---------------------------------- सहकारी गृहनिर्माण,
संस्था मर्यादित,

विषय : **तात्पुरत्या सभासदत्वासाठीचा अर्ज.**

महोदय,

संस्थेचे मृत सभासद श्री / श्रीम. --------------------------------------------------------- यांनी प्रत्येकी रुपये ---------- चे -------------- भाग / शेअर्स व संस्थेच्या इमारतीत सदनिका / गाळा क्रमांक ------------ धारण केलेले आहेत त्यांची नामनिर्देशित व्यक्ती / कायदेशीर प्रतिनिधी म्हणुन मी श्री / श्रीम. ------------------------------------------------------------ याद्वारे ----------------------------------- सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित याच्या तात्पुरत्या सभासदत्वासाठी अर्ज करीत आहे.

श्री / श्रीम. ----------------------------------------------------------- यांचे दिनांक --------------- रोजी निधन झाले आहे. त्याचे मृत्यु प्रमाणपत्र सोबत जोडले आहे. संस्थेचे मयत सभासद श्री / श्रीम. ------------------------------------------------------------- यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ च्या नियम १०६क-७ अन्वये मला / आम्हाला नामनिर्देशित केलेले होते.

किंवा

संस्थेचे मयत सभासद श्री / श्रीम. --------------------------------------------------------- यांनी कोणतेही नामनिर्देशित केलेले नाही आणि मयत सभासदाचा मी कायदेशीर वारस आहे व मी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ यांच्या तरतुदींना निष्ठापूर्वक बांधील असेल.

संस्थेचे भांडवल व मालमत्ता यामध्ये मृत सभासदाच्या नावे असलेले भाग / शेअर्स आणि व्याज सहकारी संस्थेच्या अभिलेखावर आणून ते कायदेशीर वारसांकडे हस्तांतरित होईपर्यंत कृपया मला सहकारी संस्थेचे तात्पुरते सभासदत्व देण्यात यावे ही विनंती. मृत सभासदाकडे असलेल्या भागाचे / शेअर्सचे प्रमाणपत्र यासोबत जोडले आहे.

मृत सभासदाने सहकारी संस्थेकडे दाखल केलेल्या नामनिर्देशनानुसार मी एकमेव नामनिर्देशित व्यक्ती असल्यामुळे किंवा मृत सभासदाचा कायदेशीर वारस असल्यामुळे सहकारी संस्थेच्या तात्पुरत्या सभासदत्वासाठी अर्ज करण्यास मी हक्कदार आहे. मी संस्थेची सध्याची व भविष्यातील दायित्वे जबाबदारीने पार पाडण्याची हमी देतो.

सहकारी संस्थेचे अधिनियम / नियम व संस्थेचे उपविधी यातील तरतुदी मी समजुन घेतल्या आहेत व मी त्यांचे पालन करण्यास बांधील आहे.

आपला विश्वासु

दिनांक :

ठिकाण : (नामनिर्देशित व्यक्तीची कायदेशीर वारसाची सही)

**नमुना वाय-५**

**(नियम पहा १०६ क - ६ (१), क आणि (२) (ब))**

**यथोचित नोंदणीकृत कौटुंबिक रचना करीत असलेल्या कायदेशीर वारसाद्वारे सदस्यत्वासाठी अर्जाचा नमुना**

प्रति,

सचिव,

---------------------------------- सहकारी गृहनिर्माण संस्था,

विषय **: सभासदत्वासाठी अर्ज.**

महोदय,

मी, श्री / श्रीम. -------------------------------- याद्वारे, मृत सदस्य किंवा सह-सभासदाचे कायदेशीर वारस / कायदेशीर प्रतिनिधी म्हणुन ------------------------------------------- सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, सभासदत्वासाठी अर्ज करीत आहे. श्री / श्रीम. -------------------------------- हे प्रत्येकी रु. ------------- चा आणि सहकारी संस्थेच्या इमारतीतील सदनिका / गाळा क्रमांक ----- भाग / शेअर-धारण केलेल्या संस्थेचे सभासद किंवा सह सभासद होते.

श्री / श्रीम. -------------------------------- यांचे, दिनांक / / रोजी निधन झाले असुन मृत्यु प्रमाणपत्राची प्रत सोबत जोडलेली आहे.

मी याद्वारे असे नमुद व सादर करीत आहे की, संस्थेचे मृत सदस्य दिवंगत श्री / श्रीम. -------------------------- यांच्या मालमत्तेचा वारस होण्यास हक्कदार आहे. आणि मी याद्वारे दिवंगत श्री / श्रीम. -------------------------------- यांनी धारण केलेली सदनिका क्र. ------------ चे शेअर भाग, अधिकार, हक्क आणि हित यांचे हस्तांतरण अन्य कायदेशीर वारसाना यथोचितरीत्या नोंदणीकृत कौटुंबिक व्यवस्थेत नोंद केली आहे.

मी आपणांस विनंती करीत आहे. कृपया संस्थेचा सभासद म्हणुन माझा स्वीकार करावा अशी मृत सभासदाने धारण केलेले शेअर भाग प्रमाणपत्र सोबत जोडले आहे. मी संस्थेला वर्तमानातील आणि भविष्यातील दायित्वांचे पालन करण्याचे वचन देतो.

मी संस्थेचा अधिनियम, नियम आणि उपविधींच्या तरतुदी समजुन घेतलया आहेत आणि त्यांचे पालन करण्याचे वचन देतो.

दिनांक :

ठिकाण :

आपला विश्वासू,

(कायदेशीर वारस / कायदेशीर प्रतिनिधींची स्वाक्षरी)

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्रवीण दराडे,**
शासनाचे प्रधान सचिव.